# परभणी शहर महानगरपालिका, परभणी

जा.क्र.कावि-३/आस्था/१०४९/२०१६ दिनांक :- ०३/०९/२०१६

## जाहिर सुचना

परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत खाली नमुद पदे एकत्रीत वेतनावर / मानधनावर आकरा महिन्याकरीता कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहीररित्या अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणीक अर्हता | एकत्रीत वेतन प्रति माह |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी. पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>२) स्ट्रक्चर/ रोड अँड ब्रिजेस / पर्यावरण अभयांत्रिकी / सिव्हील / वॉटर रिसोर्सेस/ सिव्हील सॉईल/ सिव्हील कन्स्ट्रक्शन /सिव्हील ट्रान्स्पोर्टेशन व तत्सम विषयातील किमान तीन वर्षाचा अनूभव आवश्यक.<br>३) राज्य शासनाकडील/महानगरपालिके कडील उप / कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४) सेवा निवृत्तांनी सेवानिवृत्तीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. | नविन - रु. ५०,०००/-<br>से.नि. - रु. ३०,०००/- |
| २ | उप अभियंता (पाणी पुरवठा) | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी. पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>२) स्ट्रक्चर/ रोड अँड ब्रिजेस / पर्यावरण अभयांत्रिकी / सिव्हील / वॉटर रिसोर्सेस/ सिव्हील सॉईल/ सिव्हील कन्स्ट्रक्शन /सिव्हील ट्रान्स्पोर्टेशन व तत्सम विषयातील किमान तीन वर्षांचा अनूभव आवश्यक.<br>३) राज्य शासनाकडील/ महानगरपालिके कडील शाखा/ सहाय्यक /उप/ कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) या पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४) सेवा निवृत्तांनी सेवानिवृत्तीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. | नविन - रु.४०,०००/-<br>से.नि.- रु. २५,०००/- |
| ३ | सिस्टीम मॅनेजर ( ई-प्रशासन) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी ही पदवी किंवा संगणक शाखेतील समकक्ष अर्हता<br>२) डेटा सेंटर प्रशासन, नेटवर्कीग (लॅन, वॅन इ.) हार्डवेअर मधील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) शासकीय/ निमशासकीय/ खाजगी क्षेत्रातील सिस्टीम अनालिस्ट या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. २५०००/- |
| ४ | पशु वैद्यकीय अधिकारी | ०१ | १) पशुवैद्यकीय विज्ञान आणि पशुसंवर्धन शाखेची पदवी.<br>२) पशुवैद्यकीय क्षेत्रातील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हता असणा-यास प्राधान्य. | रु. २५,०००/- |
| ५ | शाखा अभियंता स्थापत्य | ०३ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी<br>२) कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदावरील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | रु. २२,०००/- |
| ६ | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | ०२ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी.<br>२) या संदर्भातील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. २०,०००/- |
| ७ | शाखा अभियंता पाणी पुरवठा | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी<br>२) कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा पदावरील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | रु. २२,०००/- |
| ८ | कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा) | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदवी.<br>२) या संदर्भातील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. २०,०००/- |
| ९ | कनिष्ठ विद्युत अभियंता | ०१ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रीकी शाखेची पदवी<br>२) या संदर्भातील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | रु. २०,०००/- |
| १० | सहाय्यक नगर रचनाकार | ०३ | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची किंवा वास्तूविशारद शाखेची पदवी.<br>२) या संदर्भातील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. २०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | कनिषठ अभियंता अभियांत्रीकी | ०१ | १) मान्यता प्राप्त विघपीठाची यांत्रीकी अभियांत्रीकी शाखेची पदवी<br>२) यात्रीकी क्षेत्रातील संबधित कामाचा एक वर्षाचा अनुभव | 20,000/- |

## अटी व शर्ती

१) वयोमर्यादा :- अ) अ.क्र. ०१ ते ०३ साठी सेवानिवृत्त कर्मचा-यांना वयाची अट नाही.

ब) अ.क्रं. ०१ व ०४ साठी वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

क) अ.क्र. ०२ ते १३ साठी वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) महानगरपालिका अकृतीबंधातील रिक्त पदे सरळसेवा भरतीने भरल्यास किंवा शासन स्तरावरुन बदली होवुन आल्यास आपली सेवा संपुष्टात होईल.

३) कार्यालय आदेशाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

४) आपण परभणी शहरात रहिवास करणे आवश्यक असुन परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

५) सदर पदावर नियुक्ती नंतर मानधना व्यतिरीक्त कोणतेही आर्थीक लाभ देण्यात येणार नाहीत, पदाचे कायम हक्क प्राप्त होणार नाहीत, तसेच कायम भरतीमध्ये इतरांपेक्षा वेगळी सवलत मिळणार नाही.

६) आपण नियुक्तीनंतर कायम करण्याबाबत प्रशासनाकडे, पालिका सदस्य, समिती, सभा अथवा कोर्टाकडे अर्ज केल्यास त्यांना तात्काळ कमी करण्यात येऊन आपण शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.

७) नियुक्ती नंतर वरिल अटि व शर्तीच्या अनुषंगाने रु. १००/- च्या बॉण्डवर शपथपत्र लिहुन देणे बंधन कारक असुन सात दिवसांचे आत रुजु होणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिक्षेतील उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येतील.

८) स्वत:हून नौकरी सोडायची असल्यास एक महिना आगोदर महापालिका कार्यालयास लेखी स्वरुपात कळवीणे आवश्यक आहे.

९) भरती प्रक्रिया, नियुक्ती व पुर्ननियुक्ती संदर्भातील बदलांबाबत मा. आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील.

१०) अर्ज दिनांक १७.०९.२०१६ रोजी सायं. ५.३० वा. पर्यंत बंद लखोट्यात महापालिकेच्या आवकजावक विभागात सार्वजनिक सुट्टी वगळता कार्यालयीन वेळेत सादर करावे.

११) या पुर्वी दिलेल्या जाहीरातीतील ज्या उमेदवारांचे अर्ज अपात्र केले आहेत त्यांनी परत अर्ज करु नयेत.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

उपायुक्त 3/9/16

परभणी शहर महानगरपालिका, परभणी

प्रति,

दै.------------------------------------------------ परभणी

आपण वरिल प्रमाणे जाहिर सुचना आपल्या दि.०४.०९.२०१६ रोजीच्या दैनिकात प्रसिद्ध करून त्याचे बिल दोन प्रतित या कार्यालयास सादर करावे.